आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२६ जून २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकाच्या मसुद्याला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी/ चालू अधिवेशनात सरकार विधेयक मांडणार

- छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन

- अंमली पदार्थांच्या व्यसनाचं आव्हान साऱ्या जगाला भेडसावत असून भारताने त्याविरुद्ध जोरदार लढा उभारल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यास अपहार प्रकरणी चंपत राय आणि अनिल मिश्रा यांचे राजीनामे

**<><><><><>**

शेतकरी कल्याण योजनांचा लाभ जमीन कसणाऱ्या महिला शेतकऱ्यांनाही घेता यावा याकरता महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकाच्या मसुद्याला राज्य मत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. जमीन कोणाच्याही नावावर असली तरी ती कसणाऱ्या महिलांना शेकऱ्यांसाठीच्या सरकारी योजना आणि अनुदानाचा लाभ घेता येईल. अशा लाभार्थ्यांना महिला शेतकरी प्रमाणपत्र जारी करण्याचा प्रस्ताव विधेयकात आहे. त्यात ग्रामसभा आणि नागरी स्वराज्य संस्थांचा सहभाग असेल.

हे विधेयक विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात मांडण्यात येणार आहे.

नागपूर मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात कन्हान गावापर्यंत सुमारे दीड किलोमीटरचा उन्नत मार्ग बांधण्याच्या प्रस्तावाला कालच्या बैठकीत मंजुरी मिळाली. या कामावर ३१० कोटी ३५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. मुंबईत वर्सोवा- वांद्रे स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतू वांद्रे किल्ल्याशी जोडण्याकरता अतिरिक्त जोडरस्ता बांधण्याच्या कामाला मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा उपसमितीने काल मान्यता दिली. या कामावर सतराशे बावीस कोटी ४० लाख रुपये खर्च येणार आहे.

**<><><><><>**

छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र त्यांना आदरांजली वाहण्यात आली. तसंच त्यांच्या निमित्त साजऱ्या होणाऱ्या सामाजिक न्याय दिनानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. ऐकुया याविषयीचा वृत्तांत...

**व्हीसी**

*(छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्यासह अनेक नेत्यांनी त्यांना आदरांजली वाहिली. शाहू महाराज सामाजिक न्याय आणि समतेचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यांचे महान कार्य आणि आदर्श राष्ट्राला प्रेरणा देत आणि मार्गदर्शन करत राहील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या संदेशात म्हणाले आहेत. अमित शहा म्हणाले की, एक सुसंवादी, समतावादी आणि न्यायपूर्ण भारत घडवण्याचा शाहू महाराजांचा आदर्श आजही तितकाच समर्पक आणि प्रेरणादायी आहे. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुंबईतल्या महाराष्ट्र लोकभवन इथे शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातल्या सारथी म्हणजेच छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेच्या मुख्यालयाला भेट देऊन तिथल्या उपक्रमांची माहिती घेतली. सारथीने शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात येईल, असं फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी मुख्यमंत्र्यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही शाहू महाराजांना आदरांजली वाहिली.*

*कोल्हापूरमध्ये दसरा चौक इथल्या राजर्षी शाहू छत्रपती स्मारक भवनाचं लोकार्पण जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आले. तसंच जिल्हा प्रशासनाच्या वतीनं समता दिंडीही काढण्यात आली. हिंगोली शहरात रॅलीच्या माध्यमातून सामाजिक न्याय आणि समाज प्रबोधनात्मक फलकांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. नाशिकमधील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सांगलीत सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या वतीनं सांगली शहरात समता चित्ररथ आणि संविधान जागृती बाईक रॅली काढण्यात आली.)*

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२६ जून २०२६ - शुक्रवार

**<><><><><>**

औषध आयात करताना त्याची वैधता किमान वर्षभरासाठी असेल याची खात्री करण्याचा नियम केंद्रीय आरोग्य मंत्रालय करणार आहे. यामुळं रुग्णांना दर्जेदार औषधं मिळत राहतील आणि औषधं वाया जाण्याचं प्रमाण कमी होईल. यासाठीच्या अधिसूचनेचा मसुदा आरोग्य मंत्रालयानं आज जारी केला आहे. औषधी कायदा १९४५ मध्ये सुधारणा करणे हा या मसुद्याचा उद्देश आहे. जैविक उत्पादनं आणि किरणोत्सर्गी औषधांसाठी विद्यमान नियम कायम राहणार आहेत.

**<><><><><>**

अंमली पदार्थांच्या व्यसनाचं आव्हान साऱ्या जगाला भेडसावत असून भारताने त्याविरुद्ध जोरदार लढा उभारल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत नार्को कोऑर्डिनेशन सेंटरच्या दहाव्या बैठकीला संबोधित करत होते. अंमली पदार्थांचा विळखा हा राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक स्थैर्य, आर्थिक हितसंबंध आणि तरुण पिढी तसंच देशाच्या भविष्यासाठी धोकादायक असल्याचंही शहा यांनी यावेळी नमूद केलं. अंमली पदार्थांच्या समस्येविरुद्ध एकत्रित लढा देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

- **- -होल्ड... बाईट - अमित शहा - -**

- **<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलिंडर पुरवठ्यावर लागू केलेले सर्व निर्बंध केंद्र सरकारने पूर्णपणे हटवले आहेत. यामुळे औद्योगिक, व्यावसायिक आणि सेवा क्षेत्रातल्या ग्राहकांना एलपीजीचा पुरवठा पूर्वीप्रमाणे सुरळीतपणे उपलब्ध होणार आहे. तसंच, संकटकाळात बंद करण्यात आलेल्या घाऊक एलपीजी पुरवठ्याच्या नियमांमध्येही शिथिलता देण्यात आली आहे.

**<><><><><>**

अयोध्येच्या श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाला मिळालेल्या देणग्यांच्या अपहार प्रकरणी एफ आय आर दाखल झाल्यानंतर राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांनी आपापल्या पदांचा राजीनामा दिला आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या प्रसिद्धी विभाग संचालकांनी ही माहिती दिली.

दरम्यान, याप्रकरणी विशेष तपास पथकानं दाखल केलेल्या एफआयआरमधल्या आठ आरोपींना काल अटक केली.

एसआयटीने मंगळवारी आपला अहवाल सरकारला सादर केला होता. त्यानंतर काल एफआयआर दाखल करण्यात आला. ट्रस्टचे सदस्य कृष्णमोहन यांच्या लेखी तक्रारीवरून श्री राम जन्मभूमी पोलीस ठाण्यात अपहाराचा गुन्हा नोंदवला होता.

<><><><><>

पुण्यातलं केतन अग्रवाल हत्या प्रकरण जलदगती न्यायालयात चालवायला आणि या प्रकरणी उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करायला राज्य सरकारनं मंजुरी दिली आहे. या तरुणाच्या वडिलांनी आज पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दोषींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी तसंच मृताच्या कुटुंबियांना न्याय देण्यासाठी वचनबद्ध असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><><>

देशभरात आज मुहर्रम पाळला जात आहे. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हौतात्म्याचं स्मरण करून देणारा हा दिवस आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मोहरम निमित्त दिलेल्या संदेशात म्हटलंय की, हजरत इमाम हुसेन यांचं कार्य सत्य आणि न्यायाप्रति वचनबद्ध राहण्याची प्रेरणा देत राहील. मोहरम निमित्ताने ठिकठिकाणी 'ताझिया' मिरवणुका काढल्या जाणार आहेत. त्या दृष्टीनं वाहतुकीचं नियमन आणि सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

मोहरम निमित्त मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजार आज बंद आहेत.

<><><><><>

महसूल गुप्तचर संचालनालयाच्या नागपूर विभागानं आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम इथे कार्यरत असलेल्या वन्यजीवांच्या बेकायदा तस्करीचे एक रॅकेट उघडकीस आणून, अनेक संरक्षित वन्यजीवांची सुटका केली आहे. या वेळी एका संशयितालाही ताब्यात घेण्यात आलं. डीआरआयच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने २४ आणि २५ जूनला ही कारवाई केली. सुटका केलेले प्राणी आणि ताब्यात घेतलेल्या संशयिताला श्रीकाकुलम इथल्या वनविभागाच्या स्वाधीन करण्यात आले.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात काल दुपारनंतर उसंत घेतलेल्या पावसाने आज सकाळी पुन्हा हजेरी लावली. आज सकाळी संपलेल्या २४ तासांमध्ये सर्वाधिक ४९ मिलिमीटर पाऊस रत्नागिरी तालुक्यात, तर २४ मिलिमीटर पाऊस गुहागरमध्ये पडला. संगमेश्वरमध्ये २०, राजापुरात १४, लांज्यात ९, दापोलीत ५, मंडणगडमध्ये ४, खेडमध्ये २, तर चिपळूणमध्ये १ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

//<><><><><>//